दै. पुढारी १९ जुलै 2003

# मूल्यशिक्षणाचे महत्त्व भावी पिढीला पटवून देणे गरजेचे : प्रा. मयेकर

**कोल्हापूर :** चंगळवाद, भ्रष्टाचार, गुन्हेगारी यांचे वाढते प्रमाण पहाता भावी पिढीला मूल्यशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे, असे प्रा. गोपाळराव मयेकर यांनी सांगितले. कै. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त ताराराणी विद्यापीठाच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, उत्तमराव काळे, भैरव कुंभार उपस्थित होते. प्रा. मयेकर म्हणाले, केवळ मूल्यशिक्षणाचे धडे देऊन चालणार नाही तर ते समाजात कसे रुजेल याकडे लक्ष दिले पाहिजे. चंगळवादाला माणूस बळी पडला आहे. भ्रष्टाचार उघडपणे चालू आहे याविषयी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया फारच थंड आहे. भावी पिढीला चंगळवाद व भ्रष्टाचारापासून दूर ठेवायचे असेल तर त्यांना मूल्य शिक्षण मिळाले पाहिजे. लहानापासूनच योग्य अयोग्य गोष्टीचे ज्ञान त्यांना झाले तर रूजलेले हे विचार मोठ्यापणीही योग्य दिशा देतील. शिक्षणातूनच हे शक्य आहे. पण दिवसेंदिवस शिक्षण व्यवस्थाही खिळखिळीत बनत आहे. ज्ञानापेक्षा पैशाला महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते काकीजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी स्वागत सौ. जयश्री पाटील यांनी केले. प्रास्ताविक सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. सौ. अंजली साठे यांनी आभार मानले.

दै. तरुण भारत 31 जुलै 2003

# राजलक्ष्मी चव्हाण हिचे काव्यवाचन स्पर्धेत यश

**कोल्हापूर ■**

राजर्षि शाहूनगर वाचन मंदिर शिरोळ यांच्यावतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय खुल्या काव्यवाचन स्पर्धेत येथील कमला कॉलेजची विद्यार्थिनी कुं. राजलक्ष्मी चव्हाण हिने तृतीय क्रमांक पटकाविला. तिला प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.